PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# माहितीचा अधिकार

**प्रा. मिलिंद भ. बनसोडे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
सिद्धार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद,
जि. जालना
**महाराष्ट्र भारत**

भारतात लोकशाही शासन व्यवस्था आहे. शासन व्यवस्थेची सत्ता ही नागरीकांच्या हाती असते. कारण नागरीकच अप्रत्यक्षरित्या शासन कारभार चालवत असतात परंतु शासन / प्रशासन काय आहे याबद्दल जनतेला आजही अज्ञान आहे. शासन प्रशासन चालवणारी यंत्रणा कोणाची ? कल्याणकारी राज्य म्हणजे ? लोकशाही – लोकशाहीच अप्रत्यक्षरित्या शासन चालवते.

जाणता नागरीक हा लोकशाहीचा आधार असतो. तर पारदर्शक सरकार हे जिवंत लोकशाहीचे लक्षण असते. संसदीय शासन प्रणालीमध्ये, कायद्याचा उद्देश प्रत्येक सार्वजनिक संस्थेच्या कारभारात पारदर्शकता आणणे व तिला अधिकाधिक जबाबदार बनवणे हा आहे. आज वेगवेगळ्या देशात आपले शासन कसे प्रबळ व लोकाभिमुख होईल याकरीता शासन अनेक प्रकारचे परिवर्तने स्वतःच्या शासन व्यवस्थेत स्विकारत आहे.

प्राचीन काळ ते ब्रिटीश काळापर्यंत 'गुप्त' हेर पध्दती अस्तित्वात होती (Confidential) कायद्याचा अंमल सुरू होऊन पावणे दोन वर्षाचा काळ लोटला आहे. (कायद्याची गुप्तता Confidential Act) ग्रेट ब्रिटन मध्ये माहितीचा अधिकार देणारा कायदा करण्यापेक्षा सरकारी गूपीत संबंधीचा कायदा (Official Secrets Acts) करण्यावर भर दिसून येतो. 1971 मध्ये या O.S.A. कायद्यान्वये अंतर्गत कार्यालयीन दस्तऐवजांना गुप्त


SECOND INTERNATIONAL CONFERENCE ( ICDBVIHCIM 2018 ) 6-7 OCTOBER 2018
SPECIAL ISSUE –OCT 2018 www.puneresearch.com/times (MS) INDIA
(IMPACT FACTOR 3.18) INDEXED, PEER-REVIEWED / REFEREED INTERNATIONAL JOURNAL

ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शासन कामात गोपनीयता असावी पण शासन व्यवस्था कोणाकरीता आहे याची माहिती जनतेला असणे गरजेचे आहे.

आजच्या या माहिती व तंत्रज्ञान युगातही भ्रष्टाचार, अत्याचार, बेजबाबदारवृत्ती, अहंभाववृत्ती व लालफितशाही अशा घटना घडत आहे. त्यामुळे नागरीकांना अन्यायकारक स्थितीचा सामना करावा लागत आहे. या अन्यायाला दुर करण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम भारतीय राज्य घटनेने मानवी जिवनाला जणू कोहीनुर हिऱ्याद्वारे स्वातंत्र्य दिले परंतु माहितीच्या अधिकारा विना ते निरर्थक आहेत.

**माहिती अधिकार ऐतिहासीक आढावा** :(Historical Background of RTE)

माहिती अधिकाराचा आढावा घेत असतांना ऐतिहासिक दृष्टीने देखील या अधिकाराचा विचार करावा लागतो. माहिती अधिकार हा उत्तर युरोपीय देशामध्ये सुरुवातीच्या काळात वापरला जात होता. सरकारी कागदपत्रे पाहण्याचा अधिकार खुला केला 1766 साली. स्विडनचा आदर्श नंतर अमेरिका, नार्वे, डेन्मार्क व आर्यलंड या देशांनीही माहितीचा अधिकार कायदा आपापल्या देशात संमत केला. स्वीडन मध्ये राज्यघटनेतच 13 व्या कलमात स्वीडनच्या नागरीकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्याबरोबरच माहिती मिळविण्याचा व ती देण्याचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले आहे.

**स्वीडन** :

स्वीडनमध्ये 1766 साली Freedom of Press Act द्वारा वृत्तपत्रास स्वातंत्र्य देण्याचा कायदा देखील अंमल केला गेला.

**जर्मनी** :

जर्मनी या देशामध्ये हिटरच्या हुकूमशाही व्यव्यस्थेत नागरीकांना, पत्रकारिता, लेखकांना, कलावंत व वैज्ञानिकांना जगणे असहाय झाले होते, हिटलरच्या राजवटीनंतर नागरीकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा व माहिती मागण्याचा अधिकारचा प्रामुख्याने विचार करण्यात आला.

1949 मध्ये Federal Republic of Jarmoney च्या राज्य घटनेत 5 व्या कलमामध्ये माहिती व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उल्लेख करण्यात आलेला दिसून येतो.

**कॅनडा :**

कॅनडा या देशामध्ये कायद्यानेच हे तत्त्व स्विकारले आहे माहिती अधिकाराबरोबरच खाजगी जीवनाचा अधिकार देणारा कायदा संसदने 1980 ते 1983 या काळात संमत केला.

**माहिती अधिकार अर्थ / व्याप्ती : संकल्पना / गरज :**

अर्थ : कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या अखत्यारीत असलेली व या जोगे प्राप्त होणारी माहिती प्राप्त करण्याचा अधिकार असा आहे.

अर्थ : आकार देणे / माहिती हा शब्द Latin Word Information / Form या शब्दापासून बनला आहे. माहितीचा अर्ज कोणत्याही स्वरूपातील माहिती / साहित्य त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, अभिप्राय, सल्ला, प्रेस, आदेश, रिपोर्ट, इ–मेल, परिपत्रके, अहवाल, लॉगबूक ई. होता.

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा शासन व प्रशासनात Transparency (पारदर्शकता) निर्माण करणारा कायदा आहे. केंद्र शासन / राज्य शासन व स्थानिक शासन हे तिन्ही शासनाचे स्तर या क्षेत्रात येतात. लोकशाहीला बळकट व जन सहभाग वाढवणारा हा कायदा आहे.

**माहिती अधिकार वैशिष्ट्ये :**

1. प्रत्येक नागरीकाला शासन / प्रशासनातील कार्यालयीन माहिती मिळवण्याचा, पाहण्याचा, मागण्याचा संपूर्ण अधिकार आहे.
2. फक्त रू. 10/– भरून माहिती मागविली जाते.
3. कोणत्याही नागरीकाला विनंतीद्वारे, तोंडी, C.D. द्वारे, Electronic System द्वारे माहिती मागवल्या जाते.
4. माहिती मागणाऱ्या प्रत्येक नागरीकास 30 दिवसात माहिती देणे अनिवार्य आहे. अथवा सकारण नाकारावी.
5. अपंग, दारिद्र्य रेषेखालील लोकांना तोंडी व मुक्त मध्ये देण्याची सुविधा केलेली आहे.

30 दिवसाच्या आत माहिती देणे, अधिकाऱ्यावर बंधनकारक आहे न दिल्यास पुढील 30 दिवसात अपील आयुक्ताकडे अर्ज करता येतो. जास्तीत जास्त 45 दिवसात अपील अधिकाऱ्यास निकाल द्यावा लागतो. दिलेल्या निकालामुळे नागरीकांचे समाधान न झाल्यास 90 दिवसात राज्य जन माहिती आयुक्ताकडे दुसरे अपील करता येते.

**माहिती :**

- माहितीचा अधिकार देतांना शासन / प्रशासनाला नियम, वेळ, काळ, मर्यादा ठरवून देण्यात आलेली आहे.
- सार्वजनिक प्राधिकरणामध्ये येणारे सर्व स्तर शासकीय व प्रशासकीय प्राधिकारण.
- शासकीय निमशासकीय, स्थानिक संस्था, धर्मदाय आयुक्ताकडे नोंदवलेल्या संस्था इ. कार्य पध्दतीची माहिती मागवता येते.

माहिती देण्यास कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात कारवाई करण्याची नियमावली करून ठेवलेली आहे. प्रत्येक विलंब दिवसासाठी रू. 250/– किंवा जास्तीत जास्त रू. 25,000/– दंड माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यावर अपील करता येते.

माहिती अधिकाऱ्या विरुध्द माहिती आयुक्ताकडे अपील करता येते.

**माहिती अधिकाराची गरज :**

ब्रिटीश काळापासून चालत येणारा (Official Secret Act 1923) कायदा पुढे भारतात प्रबळ ठरला. त्यामुळे जनतेला शासनात प्रशासनात काय चालायच याची माहिती नव्हती. त्यामुळे राजकीय व प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्यात भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई, हुकुमशाही, मनमानी, अहंभाववृत्ती, अरेरावीपणा, अन्याय, अत्याचार इ. प्रमाणात वाढ होत होती. यामुळे जनता प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष शासनावर विश्वास ठेवत नव्हती.

परंतु माहिती अधिकार अधिनियम 2005 हा कायदा शासन व प्रशासन अधिकाऱ्यामध्ये, कर्मचारी वर्गामध्ये पारदर्शी, जबाबदार, उत्तरदायी होऊन सुशासन निर्मितीस लागलं. भ्रष्टाचाराला, मनमानीला, हुकूमशाही प्रवृत्तीला, दप्तरदिरंगाई, कामचुकराई इ. आळा बसण्यास सुरूवात झाली. कारण यातुनच लोकशाहीची मूल्य साधली जातात. माहितीच्या

अधिकार कायद्यामुळे नोकर वर्गाची निर्मिती होवून प्रशासन लोकाभिमुख (Action Oriented) कृती प्रवण बनते. या माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनाला (SMART) प्रशासन म्हणटले जाते.

S - Simple

M - Moral

A - Accountable

R - Responsible

T - Transperent

**माहिती अधिकार :**

माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग करून सफलतापुर्वक प्रशासन निर्माण करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. प्रशासनात (E-Goverence) च्या माध्यमातून जागरूकतेचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे (Good Goverence) सुशासन होण्यास मदत मिळत आहे.

माहिती अधिकार व (E-Goverence) मुळे प्रशासन शासन जनतेच्या घरापर्यंत पोहोचले आहे. यामुळे जनतेच्या शासन प्रशासनाची प्रत्यक्ष सहभाग वाढला आहे. प्रशासकीय, राजकीय व्यवस्था व जनता यात आदर भावना व विश्वास निर्माण झाला आहे.

प्रशासकीय यंत्रणेचा जनतेपर्यंत पोहोचल्यामुळे (शासन जनता दरबारी) प्रत्यक्ष व्यवहारात काम घटत आहे याची जाण नागरीकांना होत आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या वृत्तीला लगाम लागताना दिसत आहे.

व्यवहार पारदर्शक झाल्यामुळे, प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ झाली आहे. यावूर्वी हा पारदर्शकपणाचा अभाव होता. आम जनतेला माहिती मिळत नव्हती परंतु आता कायद्यामुळे माहिती देणे बंधनकारक ठरले आहे. त्यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता वाढली आहे.

भारतीय कायद्यान्वये गुप्तता पाळणे, माहिती न देणे गुन्हा ठरले आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळाला आहे.

भारतीय संविधानाने स्वतंत्रता, न्याय, समता, बंधूता आणि लोकशाहीला बळकट करीत अशी मूल्ये स्किकारली आहेत. याच राज्य घटनेच्या रुपाने विकासाच्या वाटा प्रगल्भ करण्याचे काम माहिती अधिकार करत आहे. माणसाला माणुसकीने वागण्याचा हक्क विचार, गोपनीयतेला खीळ बसवून जवाबदार खुले व स्वच्छ प्रशासन निर्मिती होतांना दिसत आहे. यामुळे प्रशासन व जनते मध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापीत होत आहे. जनतेच्या मनातील भिती कोसो दुर गेल्याचे चित्र आपणास दिसत आहे. तर कर्मचारी व अधिकारी यांनी वेळेत, माहिती द्यावी अन्यथा शिक्षा अशा तरतुदीमुळे कर्मचाऱ्यांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण होत आहे.

**मूल्यमापन :**

माहिती अधिकार तळागळातल्या सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचला का?

या कायद्याची माहिती तळागळापर्यंत पोहोचवण्यासाठी शासनाची प्रचार, प्रसार, माध्यम, प्रशासकीय यंत्रणा, सार्वजनिक प्राधिकरणे ई. कार्यरत झाल्या पाहिजे.

प्रशासनात माहिती अधिकार लोकशाहीला बळकट करण्यासाठी पुरक ठरतो.

**महितीच्या अधिकाराचे** Dis Advantages :

**1. भ्रष्टाचारासाठी :**

एखाद्या कर्मचाऱ्याला त्रास देण्याच्या मानसीकेतून माहिती अधिकार वापरला जातो व पैसे वसुलीचे काम करण्यात येते.

**2. मानसीक त्रास देण्यासाठी :**

कर्मचाऱ्यांच्या मनात माहितीच्या अधिकारान्वये भिती दाखवण्यात येते व आपल्या बद्दलची काय माहिती मागवता पुन्हा या चुकीच्या माहितीचे काय पडसाद उमटतील काय शिक्षा होईल अशी भीती मानसीक त्रास देऊन करता येते.

एखाद्या अधिकारी व कर्मचारी यातील काही वाद असेल तर किंवा अधिकारी असतांना यात वाद झाला असेल तर अधिकाऱ्याला त्रास देण्यासाठी, बदला घेण्यासाठी माहिती अधिकार वापरला जातो.

एखाद्या अधिकाऱ्यास पुर्व वैमनस्याच्या भावनेतून सुड काढण्यासाठी सुध्दा याचा उपयोग केला जातो. तसेच याचा उपयोग सार्वजनिक हितापेक्षा व्यक्तीगत प्रश्न सोडवण्यासाठी होतांना दिसत आहे.

## संदर्भ सूची :

1. Recent trends in pub-Adm. Dr. Panchasheel Ekambekar. Dr. Waghmage, Dr. Tarode.
2. माहितीची अधिकार आणि लोकशाही – सुनिल दाते.
3. माहितीचा अधिकार कायदा – किरण कुलकर्णी, पुणे आणि संचालक यशदा पुणे.
4. प्रगत लोकप्रशासन – प्रा.जे.के भालेराव, प्रा.बी.जी जगताप.